दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक २७४ वा रविवार दि.०७ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## 'अडवाणींनी केली होती जीनांची स्तुती': काँग्रेसचे मोदींना प्रत्युत्तर

: जनसंघ पक्षाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जींनी जिना यांच्या मुस्लिम लीगसोबत करार केला होता. काँग्रेसने कधीच करार केला नव्हता. भाजप नेते लालकृष्ण अडवाणी आणि जसवंत सिंग यांनी पाकिस्तानात जाऊन पाकिस्तानचे दिवंगत पंतप्रधान जिना यांनची प्रशंसा केली.कोणत्याही काँग्रेस नेत्याने तसे केले नाही, अशा शब्दांमध्ये काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी '-छ्ख'शी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या टीकेला प्रत्युत्तर दिले.यावेळी जयराम रमेश म्हणाले की, काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा आठ कोटी घरांमध्ये जाणार आहे. शेतकरी न्याय, महिला न्याय, युवा न्याय, कामगार न्याय. आमचे कार्यकर्ते आणि नेते आठ कोटी कुटुंबांपर्यंत पोहोचत आहेत. आम्ही देशासमोरील खरे मुद्दे मांडले आहेत देशासमोर, महिला, शेतकरी, तरुण, कामगार, वंचित लोक, मागासवर्गीय लोक, अनुसूचित जाती आणि अनुसूचित



जाती, हे महत्त्वाचे मुद्दे आहेत.काय म्हणाले होते झच् मोदी ? लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यावर मुस्लिम लीगची छाप आहे. जुनी काँग्रेस यामध्ये कोठेही दिसत नाही. यामध्ये डावे प्रबळ झाले आहेत. जे मतदारसंघ काँग्रेसचे बालेकिल्ला मानला जात होते त्या जागांवरही काँग्रेस उमेदवार उभे करण्याचे धाड करत नाही. काँग्रेस ज्या काँग्रेस ज्या व्यक्तीला तिकीट देत आहे तो दुसऱ्या दिवशी काँग्रेस सोडत आहे, अशा शब्दांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशमधील जाहीर सभेत काँग्रेसवर हल्लाबोल केला होता.आज काँग्रेस पक्षाकडे ना देशहिताची धोरणे आहेत ना देश उभारणीचा दृष्टीकोन आहे. आजच्या भारताच्या आशा आणि आकांक्षांपासून काँग्रेस पक्ष पूर्णपणे तुटलेला आहे. स्वातंत्र्य चळवळीत मुस्लिम लीगमध्ये जी विचारसरणी प्रचलित होती तीच विचारसरणी काँग्रेसच्या जाहीरनाम्यात दिसून येते. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात काँग्रेस अजिबात दिसत नाही. अशी काँग्रेस भारताला २१व्या शतकात पुढे नेऊ शकत नाही, असा दावाही नरेंद्र मोदी यांनी केला.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील सलीम उस्ताद ट्रेंडिंगला दिली सदिंच्छा भेट


लातुर प्रतिनिधी दि. ६ एप्रिल २०२४ लातूर शहरातील स्क्रॅप मार्केट असोसिएशनचे अध्यक्ष सलीम उस्ताद यांच्या लातूर शहरातील स्क्रॅप मार्केट मधील सलीम उस्ताद ट्रेडिंगला राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. ६ एप्रिल रोजी दुपारी सदिंच्छा भेट देऊन त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा केली. यावेळी लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, माजी महापौर दीपक सूळ, काँग्रेसचे लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक सर्जेराव मोरे, लातूर शहर



जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, गणेश एसआर देशमुख, माजी नगरसेवक युनूस मोमीन, काँग्रेसचे प्रभाग क्रमांक ५ चे अध्यक्ष खाजामिया शेख, यशपाल कांबळे, सुरेश डोंबाडे, प्रभाकर मैंदरकर, फादर शेख, जावेद शेख, हाफीज सय्यद, इसरार पठाण आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी स्क्रॅप मार्केटचे व्यापारी उपस्थित होते.

## चित्रा वाघ यांची नाना पटोले यांच्यावर बोचरी टीका, म्हणाल्या...

गोंदिया, : नाना पटोले हा लफडेबाज माणूस असून त्यांना लाज वाटली पाहिजे, ते अकोला येथे जाऊन आमचे खासदार संजय धोत्रे यांचा मृत्यू झाला, पाहिजे असे म्हणतात. इतक्या खालच्या पातळीची वाईट मानसिकता या लफडेबाज नानाची आहे. या खालच्या पातळीच्या कृतीबद्दल त्यांनी खासदार संजय धोत्रे आणि अकोलेकर जनतेची माफी मागितली पाहिजे, असा घणाघात गोंदिया-भंडारा लोकसभाच्या भाजप निरीक्षक चित्रा वाघ यांनी गोंदियात माध्यमांशी संवाद साधताना केला.



पुढे एका प्रश्नाच्या उत्तरात त्या म्हणाल्या, संजय राऊत हा आर्थिक लुबाडणुकीच्या गुन्ह्यात सध्या जामिनावर सुटलेला माणूस आहे. अशा १०३ दिवस कारागृहात असलेल्या माणसाला गांभिर्याने घेण्याची गरज मला तरी वाटत नाही. लोकसभा निवडणुकीनंतर त्याची जागा परत कारागृहातच असणार आहे. अबकी बार ४०० पार झाले. तर भाजप संविधान बदलणार, असे आरोप विरोधक करतात. यावर बोलताना वाघ म्हणाल्या की, पंतप्रधान मोदींनी यांनी सर्वांची खाऊ-खाऊ बंद केली आहे. विरोधकांना भ्रष्टाचाराची सवय झाली आहे. हे कितीतरी वेळा आत बाहेर झालेले आहेत.तो मद्य घोटाळ्यातील अरविंद केजरीवाल, तो चारा घोटाळ्यातील लालू यादव, तो जमीन घोटाळ्यातील हेमंत सोरेन, प. बंगाल संदेशखाली घटनेची संशयाची सुई असलेली ममता बॅनर्जी, हे सगळी घोटाळेबाज मंडळी मोदींच्या 'ना खाऊंगा ना खाने दुंगाख्र या धोरणाने त्रस्त झालेले आहेत. म्हणून यांना पुन्हा मोदी नको आहेत. पण या देशातील बहुतांश जनता मोदींच्या पाठीशी आहे. येत्या ४ जूनला या सगळ्यांना चारही मुंड्या चीत केल्याशिवाय मोदी राहणार नाहीत. असा विश्वास वाघ यांनी व्यक्त केला.या प्रसंगी त्यांच्या सोबत खासदार पत्नी शुभांगी मेंढे, माजी नगर सेविका मैथिली पुरोहित, निर्मला मिश्रा , मैथूला बिसेन उपस्थित होत्या.

## टीमवर हल्ला; ममता बॅनर्जी म्हणाल्या, स्थानिक लोकांनी...

: राष्ट्रीय तपास संस्थेच पथक मेदिनीपूरमध्ये मध्यरात्रीनंतर छापा टाकण्यासाठी का आले?, विचित्र वेळेत छापे टाकण्यासाठी पथकाला आवश्यक परवानगी होती का, असे सवाल करत स्थानिक लोकांनी मध्यरात्री गावात अनोळखी व्यक्ती आल्यावर जे करायला हवे होते तेच केले, अशी प्रतिक्रिया पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दिली आहे. दरम्यान, पश्चिम बंगाल भाजपने या प्रकरणी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. तृणमूल काँग्रेसने आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे.२०२२ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आज पहाटे दिनीपूर जिल्ह्यातील भूपतीनगर भागात छ्ख- अधिकार्यांचे पथक गेले होते. यावेळी स्थानिकांनी त्यांच्यावर हल्ला केला . या घटनेने राज्यात खळबळ उडाली. या घटनेचा भाजपने तीव्र निषेध केला आहे.ममता बॅनर्जी म्हणाल्या की, छ्ख- पथकाने मध्यरात्री छापा का टाकला?, त्यांनी ही कारवाई करण्यासाठी पोलिसांची परवानगी घेतली होती का? मध्यरात्री त्या ठिकाणी कोणी अनोळखी व्यक्ती आल्यास स्थानिकांनी तशीच प्रतिक्रिया दिली. स्थानिक लोकांनी मध्यरात्री गावात अनोळखी व्यक्ती आल्यावर जे करायला हवे होते तेच केले.यावेळी अरविंद केजरीवाल यांच्या अटकेचा संदर्भ देत ममता बॅनर्जी म्हणाल्या की, निवडणुकीच्या आधी ते लोकांना का अटक करत आहेत? भाजपला वाटते की, ते प्रत्येक बूथ एजंटला अटक करतील? 'एनआयए'कडे काय अधिकार आहेत? हे सर्व भाजपला पाठिंबा देण्यासाठी केले जात आहे. भाजपच्या या घाणेरड्या राजकारणाविरुद्ध लढा देण्यासाठी आम्ही सर्वांना आवाहन करत असल्याचेही त्यांनी सांगितले.'एनआयए' अधिकाऱ्यांच्या पथकाने आज सकाळी बॉम्बस्फोट प्रकरणाशी संबंधित दोघांना अटक केली. यावेळी हे पथक कोलकाता येथे परत जाताना जमावाने त्यांच्या वाहनावर हल्ला केला. स्थानिकांनी वाहनाला घेराव घातला. त्यावर दगडफेक केली. या हल्ल्यात एनआयएचा एक अधिकारी देखील जखमी झाला आहे, असे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. एनआयएने याप्रकरणी पोलिसात तक्रारही दाखल केली आहे. दरम्यान, या हल्ल्यावर भाष्य करताना भाजपच्या बंगाल युनिटने या घटनेला घृणास्पद म्हटले आहे. केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद यांनी बिहारच्या पटना येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले, हे पहिल्यांदाच घडले आहे का? अंमलबजावणी संचालनालयावर हल्ला झाला की नाही? संदेशखलीचे सत्य बाहेर आले की नाही? आता एनआयए, कारण जेव्हा ते दहशतवाद्यांशी राज्यात कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे मोडकळीस : सुवेंदू अधिकारी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि बंगालचे विरोधी पक्षनेते, सुवेंदू अधिकारी म्हणाले, बंगालची कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे मोडकळीस आली आहे. निवडणूकआयोगाने भूपतीनगर पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी, पूर्वा मेदिनीपूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक आणि राज्याचे पोलीस महासंचालकांवर योग्य कारवाई करावी. अशी मागणीही त्यांनी केली.संदेशखाली येथे ईडीच्या अधिका-यांवर हल्ला झाल्यानंतरही ममता बॅनर्जींनी वारंवार चिथावणी दिल्याने तृणमूल काँग्रेसचे नेते एनआयए अधिकाऱ्यांवर हल्ला करण्याचे धाडस करू शकले. नुकतेच कूचबिहारमधील माथाभंगा येथील राजकीय कार्यक्रमात त्यांनी एनआयएबद्दल टीका केली होती, असेही असेही अधिकारी यांनी म्हटले आहे.प. बंगालचे नागरिक म्हणून लाज वाटते : भाजप नेत्या अग्निमित्र पॉल या हल्ल्याबाबत भाजप नेत्या अग्निमित्र पॉल म्हणतात, पश्चिम बंगालचे नागरिक म्हणून आम्हाला लाज वाटते. काही दिवसांपूर्वी आम्ही ईडीच्या अधिकाऱ्यांवरही हल्ले झाल्याचे पाहिले होते. आज एनआयएवर हल्ला झाला. आज जे घडले त्याची जबाबदारी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना घ्यावी लागेल.

## प्रतीक्षा संपली..! मस्क यांनी जाहीर केली अनावरण तारीख

टेस्ला कंपनीची बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षीत टेस्ला रोबोटॅक्सी अनावरण तारीख कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी ( सीईओ) एलॉन मस्क यांनी जाहीर केली आहे. टेस्ला रोबोटॅक्सीचे ८ ऑगस्ट रोजी अनावरण केले जाईल, अशी पोस्ट त्यांनी त्यांच्या द हॅण्डलवर पोस्ट केली आहे. टेस्लाचे शेअर शुक्रवारच्या शेअर मार्केट बंद होईपर्यंत ३४ टक्क्यांनी घसरले . मस्क यांनी रोबोटॅक्सीची बातमी पोस्ट करण्याच्या काही काळापूर्वी, त्याने जगातील तिसरे-श्रीमंत व्यक्ती म्हणून आपले शीर्षक गमावले. जे आता चे मार्क झुकरबर्ग यांच्या नावावर आहे.एलॉन मस्क यांनी पूर्णपणे स्वयंचलित टेस्ला रोबोटॅक्सी २०१९ मध्ये गुंतवणूकदारांसमोर सादर केली होती. टेस्लाच्या उच्च मूल्यमापनासाठी ही सर्वात मोठी घोषणा होती. टेस्लाने ग्राहकांसाठी ड्रायव्हर-सहायता सॉफ्टवेअरची नवीनतम आवृत्ती लाँच केली आहे. ती पूर्ण स्वयं-ड्रायव्हिंग म्हणून बाजारात आणली जाईल.याबाबत कंपनीने स्पष्ट केले आहे की, त्याच्या पुढील पिढीच्या वाहन प्लॅटफॉर्ममध्ये परवडणारी कार रोबोटॅक्सीचा समावेश असेल. कंपनीने दोघांचा टीझर रिलीज केला आहे; परंतु अद्याप यापैकी एकाचा प्रोटोटाइप सादर केलेला नाही. मस्क यांनी केलेल्या ट्विटवरून असे दिसून येते की स्वस्त कारपेक्षा रोबोटॅक्सीला प्राधान्य दिले जात आहे. जरी दोन्ही एकाच प्लॅटफॉर्मवर डिझाइन केले जातील.मस्क यांनी रोबोटॅक्सी कार निर्मितीची योजनाच रद्द केली आहे

## जम्मू काश्मीरमधील किश्तवारमध्ये सौम्य भूकंपाचे धक्के

गेल्या दोन दिवसांपासून जम्मू काश्मीरमध्ये सतत भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. आज (दि.६) दुपारी २ वाजून ५३ मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. या भूकंपाची तीव्रता ३.८ रिश्टर इतकी होती, अशी माहिती राष्ट्रीय भूकंपविज्ञान केंद्राने दिल्याचे वृत्त एएनआयने दिले आहे. यापूर्वी गेल्या २४ तासाहून अधिक कालावधीत जम्मू-काश्मीरच्या केंद्रशासित प्रदेशातील किश्तवाड आणि डोडा जिल्ह्यात भूकंप झाला. या भूकंपाची तीव्रता३.२ ते २.६दरम्यान रिश्टर स्केलवर नोंदवण्यात आली आहे. यामध्ये कोणतेही नुकसान झाल्याची माहिती नाही, असेही स्थानिक माध्यमांनी दिलेल्या माहितीत स्पष्ट केले आहे. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीनुसार, जम्मू काश्मीरमधील किश्तवारमध्ये पाच तर डोडामध्ये एक भूकंप झाला. शुक्रवारी (दि.५) रात्री ११ वाजेपर्यंत एकूण सहा धक्के बसले होते.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते लातूर शहरातील एआरबी फुटवेअर होलसेल दालनाचे उद्घाटन

लातुर प्रतिनिधी- दि. ६ एप्रिल २०२४ लातूर मधील सामान्य माणसाची परवडणारी चप्पल म्हणून बनसोडे यांच्या चप्पलला ओळखले जाते, गेली अनेक वर्ष या फुटवेअर व्यवसायात बनसोडे कुटुंबीय काम करून ते लातूरचे नाव मोठे करत आहेत, असे सांगून राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बनसोडे कुटूंबियांना व्यवसाय वाढीसाठी शुभेच्छा दिल्या. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते शनिवार दि. ६ एप्रिल रोजी दुपारी लातूर शहरातील आंबेडकर चौक परिसरातील अक्षय राजकुमार बनसोडे यांच्या एआरबी फुटवेअर होलसेल दालनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, माजी महापौर दीपक सुळ, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विलास को-ऑपरेटिव बँकचे व्हॉईस चेअरमन समद पटेल, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक पृथ्वीराज शिरसाठ, माजी नगरसेवक सचिन मस्के, विजयकुमार साबदे, युनूस मोमीन, विकास कांबळे, गणेश एसआर देशमुख, दीप्ती खंडागळे, सुमित खंडागळे, राजू गवळी, अकबर माडजे, बालाजी झिपरे, अभिषेक पतंगे, श्याम बरुरे, राज क्षीरसागर, इसरार पठाण, युसुफ शेख, अब्दुला शेख, युसुफ बाटलीवाला आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी बनसोडे कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूरचा नावलौकिक वाढवण्याचे काम अक्षय बनसोडे करत आहेत. आमच्या आजोबांच्या काळापासून लातूर शहरात सामान्य माणसाला बनसोडे कुटुंबीय सेवा देत आहेत, त्यांनी रिटेल व्यवसायातून होलसेल व्यवसायात पदार्पण केले आहे. ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर ही व्यवसाय करावा त्यासाठी त्यांना सर्वतोपरी सहकार्य करून अशी ग्वाही त्यांनी दिली. पुढे बोलताना ते म्हणाले की, सामान्य माणसाची परवडणारी चप्पल म्हणून बनसोडे यांच्या चप्पलला ओळखले जाते, गेली अनेक वर्ष फुटवेअर व्यवसायात बनसोडे कुटुंबीय काम




करून ते लातूरचे नाव मोठे करत आहेत, असे सांगून माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी बनसोडे कुटूंबियांना व्यवसाय वाढीसाठी शुभेच्छा दिल्या. लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे हे लातूर शहरातील सुभाष चौक, बस स्टॅन्ड आणि आता ते श्याम नगर मध्ये त्यांच्या रुग्णालयाच्या माध्यमातून रुग्ण सेवा करत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या संविधानाशी इमान राखणारे ते महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत, भाजप सरकारच ४०० पार आणि संविधानावर वार असे धोरण आहे. याकरीता मतदारांनी जागरूकपणे मतदान करावे, या लोकसभा निवडणुकीमुळे देशात व राज्यात बदल होतील असेही त्यांनी सांगितले लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यावेळी बोलतांना म्हणाले की, लातूर शहरात सन १९८० पासून आंबेडकर चौक परिसरातुन मी जात असताना बनसोडे फुटवेअरची गर्दी पाहिली आहे, मी आता या होलसेल दुकानातून पहिली चप्पल खरेदी केली आहे. ग्राहकांनीही बनसोडे ब्रँडवर खूप प्रेम केले आहे, बनसोडे कुटुंबियांना व्यवसाय वाढीसाठी शुभेच्छा देतो असे सांगून त्यांनी लातूर लोकसभा निवडणुकीत हात चिन्हासमोरील बटन दाबून मला विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले

# संपादकीय....

## मनरेगाची वेतन सुधारणा

अभिजित मुखोपाध्याय, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) वेतनात सुधारणा केली. यानुसार वेगवेगळ्या राज्यांत सुमारे ४ ते १० टक्के वेतनवाढ केली आहे. यामुळे मजुरांना काहीअंशी महागाईपासून दिलासा मिळणार आहे. मजुरी वाढल्याने विविध कल्याणकारी योजना यशस्वी करण्यात सहकार्य मिळेल आणि काही योजनांवरचा दबावही कमी राहील. त्यामुळे ही नवीन किमान वेतन व्यवस्था लवकरच आकारास येईल, अशी आशा आहे.वेगवेगळ्या राज्यांत वेगवेगळ्या दराने वेतन किंवा मजुरी वाढवताना स्थानिक पातळीवर दैनंदिन जीवनात येणारा खर्च हा प्रमुख आधार आहे. वेतन वाढीनंतर मनरेगा कामगारांची हरियाणात सर्वाधिक ३७४ रुपये आणि अरुणाचल प्रदेश आणि नागालँडमध्ये सर्वात कमी २३४ रुपये एवढी मजुरी निश्चित झाली आहे. सिक्कीमच्या तीन ग्रामपंचायतींच्या हद्दीतदेखील मनरेगा कामगारांना ३७४ रुपये मिळतील. पश्चिम बंगालमध्ये तेरा रुपयांच्या वाढीसह २५० रुपये तसेच बिहारमध्ये १७ रुपयांच्या वाढीसह मजुरी २२८ रुपये मजुरांना मिळणार आहेत. अर्थात, मजुरीत वाढ करताना कोणकोणत्या आधारभूत घटकांचा विचार केला, हे मात्र स्पष्ट झालेले नाही. वाढीचा दर ४ ते १० टक्के असला तरी ही किमान वाढ आवश्यक होती, हे सिद्ध झाले आहे.ग्रामीण विकास व पंचायत राजच्या संसदीय स्थायी समितीच्या अहवालात म्हटले आहे की, विविध राज्यांत मनरेगाच्या मजुरीत बरीच तफावत दिसून येते. मजुरांना दिला जाणारा भत्ता हा सध्याच्या वाढत्या खर्चाच्या अनुरूप नाही, असेही समितीने म्हटले आहे; पण कालांतराने मजुरीत सुधारणा करताना या गोष्टींचा विचार करायला हवा. ज्या राज्यांकडे अधिक उत्पन्नांचे स्रोत आहेत, तेथे मजुरी अधिक मिळत असल्याचे दिसून येते; पण मजुरीत वाढ करताना राज्यांच्या स्थितीचे आकलन करू नये, कारण मनरेगा ही भारत सरकारची योजना आहे. वेगवेगळ्या ठिकाणच्या खर्चात फरक आहे; मात्र मूलभूत गोष्टी, जसे खाण्यापिण्याच्या वस्तू महाग होत आहेत आणि महागाईचे चटके सर्वत्रच बसत आहेत. त्यामुळे स्थायी समितीच्या प्रस्तावानुसार मजुरीतील तफावतही कमी करायला हवी आणि त्यात समानता आणून योग्यरीतीने वाढ करायला हवी. यानुसार मजुरांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह योग्यरीतीने करता येईल.केंद्र सरकार आता किमान वेतनाच्या (प्रत्येक पातळीवर) व्यवस्थेत बदल करत नवीन व्यवस्था आणण्याचा विचार करत आहे आणि त्यानुसार किमान मजुरी निश्चित करताना दैनंदिन खर्चाचे आकलन केले जाणार आहे. याकामी सरकार आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेसारख्या संस्थेची मदत घेण्याचा विचार करत आहे. विशेष म्हणजे यापूर्वी शेवटची वेतन सुधारणा २०१७ मध्ये झाली होती. यानुसारच किमान मजुरीचा दर निश्चित केला. तसेच किमान मजुरी देण्याच्या नियमांचे पालनही योग्यरीतीने केले जात नसल्याचे आढळून आले आहे.पण, आता नव्या व्यवस्थेत यासंदर्भात ठोस तरतुदी करणे गरजेचे आहे. किमान मजुरी असो किंवा दैनंदिन खर्चाच्या हिशेबाने दिली जाणारी मजुरी असो, कामगारांना जर योग्य मोबदला मिळाला नाही तर अशा व्यवस्थेचा उद्देशच अपूर्ण राहील. सध्या नव्या व्यवस्थेबाबत चर्चा सुरू असून, उदरनिर्वाह योग्यरीतीने व्हावा आणि पालनपोषण चांगले होईल हाच आधार मजुरी निश्चित करताना राहील, असे म्हटले जात आहे. याचाच अर्थ केवळ दोन वेळच्या भोजनासाठी सोय नाही तर घर, शिक्षण, आरोग्य या गोष्टींचीदेखील दखल घ्यावी लागणार आहे. मनरेगाची मजुरी ही ग्रामीण भागात काम करणार्या लोकांसाठी मोठा आधार ठरत आहे. या कारणामुळे अनेक मजुरांना त्याचा फायदा मिळाला आहे.

# परिवर्तनाच्या दिशेला झेपावणाऱ्या: ओल्या जखमा

एका यशवंत कवींनी कविता ही आकाशातील वीज आहे तिला धरून पाहणारे शेकडो लोक जळून खाक झाल्याशिवाय राहणार नाही असं म्हटलंय. त्यामुळे कविता हा कठीण विषय आहे असं मला नेहमी वाटायचं .पण जो न देखील रवी वह देखे कवी हे ही ऐकलं . त्यामुळे कविता ही सर्वव्यापी आहे. ती कवीच्या डोळ्यात नेहमी वास्तव्यास असते . थोडक्यात कवीता ही आकाशातील वीज नाही तर कविता म्हणजे चिमूटभर शब्दात मूठभर अर्थ सांगण्यचा साहित्यप्रकार म्हणजे कविता . 'ओल्या जखमा' हा प्रा. भगवान सुखदेवे सरांचा असाच चिमुटभर शब्दात मूठभर अर्थ सांगणारा कवितासंग्रह आहे. साहित्याच्या प्रांतात आपला वेगळा ठसा उमटवणारे दलित साहित्य, आंबेडकरी साहित्य ,आंबेडकरवादी साहित्य, फुले शाहू आंबेडकरी साहित्य.. हे सर्व साहित्य गटातटात विभागले असले आणि त्याची नावे घेणारे वेगळे असले तरी अंतिम ध्येय एकच आहे, ते म्हणजे दलित पीडित समाजाचे दुःख, त्यांचे प्रश्न आपल्या लेखणीत शब्दबद्ध करून वंचितांच्या प्रश्नांना उत्तरे शोधणं. देशावर, त्या परिस्थितीवर बोट ठेवून वास्तव जगासमोर मांडणं आणि सन्मानाने जगण्याची अपेक्षा करणं हेच आंबेडकरवादाचं अंतिम ध्येय आहे. जगाला, देशाला आंबेडकरवादच पर्याय आहे . आंबेडकर वादच माणसाची जोडणी करू शकतो. फाटटलेल्या आयुष्याला ठिगळ नाही तर कोरं करकरीत चमकदार आयुष्य देण्याचं सामर्थ्य फक्त आंबेडकर वादातच ,आंबेडकरी साहित्यातच आहे. कवी प्रा भगवान सुखदेवे सर महापुरुषांच्या, बाबासाहेबांच्या , बुद्धांच्या, विचारांनी पूर्णपणे नाव न्हाऊन निघाले आहेत. आपल्या आत्मसन्मानासाठी बाबासाहेबांचा विचार किती मोठा आहे हे प्रा. भगवान सुखदेवे सरांना समजलेला आहे. त्यामुळेच ओल्या जखमांचे दुःख ते पेलवू शकले आहेत. आंबेडकरवादाने प्रेरित झालेला माणूस हरत नाही. निराश होत नाही. पळवाटा शोधत नाही. तो परिस्थितीशी झगडतो . त्यातून मुक्तीचा मार्ग काढतो. मग प्रा. भगवान सुखदेव सर मागे कसे राहतील? ओल्या जखमांची वेदना कमी करण्याचा विचार त्यांनी कवितांमध्ये पेरला आहे . हा विचार पेरण्याची त्यांना आवश्यकता का वाटली? कारण त्यांच्याच नाही तर आपल्याही पूर्वजांनी जे भोगले ते कवी प्रा. भगवान सुखदेवे सरांच्या मनात सलत राहिलं. ती सल ओल्या जखमांचे रूप घेऊ लागली .तेव्हा कोण आपला कोण परका हे समजण्याचं भान सुखदेवे सरांना आलं आहे .काळाचे संदर्भ बदलले असले तरी आजही प्रस्थापितांच्या विचारात फारसा बदल झालेला नाही हे वास्तव सुखदेव सर अचूक हेरतात . मंडीला मंडी घालून सोबत बसणाऱ्यांच्या मनात आपल्याविषयी काय चाललंय ते कवींना चांगलंच ठाऊक आहे. म्हणून ते लिहितात

, आमच्या जीवनप्रवासात एकेका चौकात  
आणि रस्त्यांच्या प्रत्येक वळणावर  
डोळ्यासमोर असा हात ठेवून  
आषाढ भूत नजरेनं आम्ही  
आवश्यक सौजन्याला  
न्याहाळत आहोत,  
अजूनही ते  
दृष्टीपथात नाही...'


हे वास्तव जखमा आणखी ओल्या करतं. हा अनुभव प्रा. सुखदेवे सरांचा असला तरी आपल्यापैकी अनेक जण त्याची झळ सोसून गेले आहेत . त्यामुळे जो न देखे रवी वह देखो कवी हे खरं वाटतं. कवीकडे सूक्ष्मदृष्टी आहे. लक्षवेधी निरीक्षणं आहेत. त्यांनं कवी व्यथित होतात. पूर्वजांच्या स्वप्नांचा चुराडा झाल्याची कवींना जाणीव आहे. आणि खंत ही आहे .त्यामुळे ते अस्वस्थ होतात. कवीच्या मनावर आंबेडकरी विचारधारेचा प्रभाव आहे. माणसं बदलण्याची ताकत या विचारातच आहे त्यामुळे साहित्याच्या प्रांतात आंबेडकरी साहित्य आपला वेगळा ठसा उमटवू आहे. परिवर्तनाच्या प्रक्रियेत आंबेडकरी समाज आघाडीवर आहे. परिवर्तनाचा महामार्ग आंबेडकरी वस्त्यांतून जातो. इथल्या बहुजन समाजाची पिळवणूक होते. शेती आपली पण पिकाचा भाव ठरवणारे दुसरेच. भक्ति आपली पण पुजारी दुसरेच .गाय म्हशी आपल्याच पण दूध तूप खाणारे वेगळेच. आपण कितीही लायक असलो तरी संत म्हणून मान्यता नाही. आपल्यात कितीही लायकी असली तरी सत्तेचे कासरे सांभाळणारे दुसरेच आहेत. बहुजन समाज कायम भरडला गेलाय .तरी जात धर्माचा अंतर राखून एकमेकांना पाण्यात पाण्याची परंपरा हा समाज पाळतो आहे. कवी प्रा . भगवान सुखदेवे सरांनी ही विसंगती अलगत टिपली आहे . दानधर्म कर्मकांड याशिवाय आपल्या आपल्याकडे काही राहिलं नाही, ही सल त्यांच्या ओल्या जखमा उजागर करते .

आभाळाकडे डोळे आपले  
राज दरबाराचे न्यारे वारे  
घरच्या गाईचे तूप  
तुझ्या अंगी लागले नाही  
माझे सोड पण तुझ्याही शिवाय,  
दरबाराचे अडले नाही ...

अशा परखड शब्दात ते व्यक्त होतात. आश्रमातील माणसं संसदेकडे जातात. पण बहुजन समाजाला अजूनही आश्रमांचे आकर्षण आहे. संत साधूंचे वेड आहे. तिथे प्रवेश नाकारला असला तरी आश्रमाची आकर्षण कमी होत नाही. पण शाळा दोघांचीही आहे असं ते सांगतात. आणि इथे समतेचा विचार आहे हे सांगायला ही कवी विसरत नाही. म्हणून ते लिहितात ,

स्वतःला वरचा समजायची  
ही तुझी जुनी खोड  
घे तिच्याशी काडीमोड  
आणि माझाही गुण मान्य कर...

गुणांच्या बाबतीत मी कमी नाही हे कवी ठासून सांगतात.




वरचा, खालचा उच्च ,नीच अशा विचारांना गाडून समतेच्या दिशेने कवींचा प्रवास चालला आहे. या प्रवासात त्यांनी वैचारिक दृष्टीने झोपलेल्यांना जागवण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रवासात सर्वांनी सोबत राहावं असा कवींचा आग्रह आहे.

कोरोनाचा काळ सर्वांच्या स्मृतीत जमा आहे. त्याचा विसर पडणे शक्य नाही .इथे कोरोना झालेला माणूस अस्पृश्य झाला होता .हा कधीतरी इतिहास होईल. काही काळ जग थांबलं होतं. आणि नात्यातील अंतर वाढलं होतं . श्वासही, (ऑक्सिजन) विकत घ्यावा लागायचा. त्यासाठी ही नंबर लागायचा नाही .काही काळ श्वास विकायचा धंदा ही जोरात चालला होता. दवाखाने रुग्णांनी खचाखच भरले होते. बैलांचे मुस्के( मास्क) माणसांनी घातले होते. पण माणूस त्यावेळी धड बैलही झाला नाही .आणि धड माणूसही झाला नाही. खरे तर अडचणींच्या वेळी माणसाने माणसाकडे माणसासारखं पाहायला पाहिजे .पण त्याच वेळी माणूस धंदेवाईक झाला होता. बेड मिळवण्यापासून ऑक्सिजन मिळवण्यापर्यंत ,जो रुग्णांचा प्रवास होता तो आठवला की अजूनही अंगावर काटा उभा राहतो. कोरोनाने वैद्यकीय क्षेत्रात दलालांची फौज निर्माण केली. पैसा असेल तर उपचार नसेल तर रोगी थंडगार अशी स्थिती निर्माण झाली होती. विज्ञानाने केलेली प्रगती अगदी जादू सारखी आहे. खरेच ती तशीच जादूई वाटते आहे. याचं हृदय त्याला आणि त्याचं हृदय याला. याची किडनी त्याला किंवा त्याची किडनी याला. अगदी काही वेळेचा खेळ ! मरणाच्या दारातला माणूस अनेकदा बरा होऊन परतला आहे, हा अनुभव अनेकांना आला असेल. काहींनी किमान ऐकलं असेल. या अर्थाने डॉक्टर देव वाटत गेला . पण डॉक्टरांचं सेवा क्षेत्र ही भ्रष्टाचाराने बरबटलं . (काही चांगल्या डॉक्टरांचे खूप खूप आभार ) वैद्यकीय क्षेत्रातील देवांनाही पाझर फुटला नाही. कवी प्रा. भगवान सुखदेव सरांनी ' दगड ' कवितेत वास्तव मांडलाय . ते असं,

एक म्हातारी दवाखान्यातल्या ' देवाला '  
हात जोडून विनवत होती:  
माह्या नातवाले बरा कर  
कामधंदा बंद आहे  
माहा हात तंग आहे  
आहे ते अर्पण करतो  
'दगड'...' टस का मस' झाला नाही  
नातवाना दम तोडला  
तसा म्हातारीनं  
दगडा पुढे हंबरडा फोडला..

नेहमी मृत्यूला सजवणारी माणसं मी बघत आलोय . गरीब असो की श्रीमंत , प्रेताची आंघोळ, सुवासिक साबण, तेल, आत्तर, धूप ,कापूर, चंदन, अगरबत्ती ....इत्यादी आणि फुलांची चादर.आणि प्रेतावर पैशांचा वर्षाव, फुलांचा वर्षाव ,फटाक्यांचा आवाज, ढोल ताशे, दिंडी- भजन .. अशा अनेक प्रकाराने मी मृत्यू सजलेला पाहिला .कोरोनात हे सारे बदललेले होते. चिरफाड झालेला घाईत शिवलेला देह कापडात गुंडाळला की अखेरची आंघोळ न करताच त्याची स्मशानाकडे मोजक्या लोकात जाण्याची तयारी . एक शायर म्हणून गेलाय ,

यार मरने के बाद  
मै एक खता और करुंगा  
पैदल चलेंगे लोग  
मै कंधे पे चलूंगा

पण कोरोनात प्रेत स्वर्ग रथात म्हणजे चार चाकी गाडीत आणि नातेवाईक मागे अशी स्थिती होती . प्रत्येकाच्या हातात ग्लोव्हज, हातात सॅनिटायझर ची बॉटल आणि तोंडाला मुस्का म्हणजे मास्क. १८९७ मध्ये प्लेगची साथ आली होती. असंख्य माणसं मृत्युमुखी पडली होती. जीवाच्या भीतीने पोटच्या पोराला माय टाकून गेली. त्याला सावित्रीबाईंनी कवटाळलं. उपचार केले पण सावित्रीबाईंचा मृत्यू झाला. कोविड काळात कवी प्रा. भगवान सुखदेव सरांना माईंच्या त्यागाची सेवेची आठवण झाली.' मायतू असतीस तर' कवितेत ते लिहितात...

कशाला अर्थ उरला नाही  
'येत्याला' आत घेतलं जात नाही  
'जात्याला' सन्मान नाही  
कसली शान नाही, कुणाला आण नाही  
तूच सांग ...  
आम्ही कुणाकडे जाऊन  
नात्याचा अर्थ शिकावा ?

कवी मुळातच हळव्या मनाचे आहेत. त्यामुळे अनेक घटनांचा ,प्रसंगांचा कवींनी सच्च्या दिलाचा माणूस म्हणून विचार केलेला आहे. प्रत्येक प्रसंगाने त्यांच्या मनावर जखम झाली आहे. ती जखम पेलण्याचं सामर्थ्यही त्यांच्यात आहे . बुद्ध फुले शाहू आंबेडकर अशा अनेक महापुरुषांचा प्रभाव त्यांच्या लेखणीत जाणवतो. त्यामुळेच ओल्या जखमा परिवर्तनाच्या दिशेला झेपावतांना दिसतात. परिवर्तनाच्या दिशेला जाण्यासाठी आवश्यक ते वैचारिक रतीब कवींनी पुरविलेले आहे. आंबेडकरीमुळे साहित्यात ओल्या जखमा चं महत्व वाढणार आहे.

कवी पूर्व विदर्भातील भंडारा जिल्ह्याचे रहिवासी असल्याने त्यांच्या कवितांमध्ये झाडीपट्टीतील शब्द हमखास सापडतात. येथील ती लोकभाषा असल्याने त्या भाषेचा गोडवा आणखीच रंग भरतो. ओल्या जखमा हा एकूण ७३ कवितांचा संग्रह असून ख्यातनाम कवी युवराज गंगाराम सरांनी प्रस्तावना लिहिली आहे .ती ही वाचकांचे मन वेधून घेते.

कवी आणि ओल्या जखमांना आभाळभर शुभेच्छा...

********

**राजू बोरकर**
**मु.पो.ता. लाखांदूर**
**जिल्हा भंडारा**
**७५०७०२५४६७**

# संकटात संधी!

प्रत्येक संकटात एक संधीही दडलेली असते असे म्हणतात! संकटाने हात-पाय गाळून बसायचे की, आलेल्या संकटाशी भिडून त्यात दडलेल्या संधीचा योग्य वापर करून संकटावर मात करायची, हे बहुतांशी ज्याच्या त्याच्या दृष्टिकोनावर व मानसिक कणखरतेवर अवलंबून असते. विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीने रविवारी केंद्रातील भाजप सरकारविरोधात जोरदार ऐक्याचे प्रदर्शन घडवत जे रणशिंग फुंकले ते पाहता विरोधकांना संकटात टाकून येणारी निवडणूक एकतर्फी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या भाजपच्या 'अजेय जोडी'च्या पोटात नक्कीच गोळा उठला असणार! काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'इंडिया' आघाडीने भाजपविरोधासाठी का असेना पण ऐक्याचे जोरदार प्रदर्शन करून जे प्रचाराचे रणशिंग फुंकले आहे ते पाहता 'इंडिया' आघाडीने संकटातील संधी योग्यरीत्या साधली आहे, असेच म्हणावे लागेल! 'इंडिया' आघाडी अस्तित्वात आल्यापासून भाजपची 'अजेय जोडी' या आघाडीच्या ऐक्याला सुरुंग लावण्याचा हरत-हेने प्रयत्न करते आहे. दुर्दैवाने इंडिया आघाडीतील काही पक्षांच्या नेत्यांचे अहंकार व त्यांच्या सुप्त महत्त्वाकांक्षा यामुळे भाजपच्या प्रयत्नांना यश मिळून विरोधकांच्या या ऐक्याच्या चिरफळ्याच उडत असल्याचे चित्र होते. आघाडीचे नेतृत्व करणा-या काँग्रेसने सामंजस्याची भूमिका घेऊन मनाचा मोठेपणा दाखविण्याची तयारी दर्शवूनही तृणमूल काँग्रेस, आप, सपा वगैरे पक्षांनी आडमुठी भूमिका घेतल्याने आघाडीच्या जागावाटपात ऐक्याचे दर्शन होऊ शकले नव्हते.त्यामुळे भाजपविरोधात प्रचाराचे एकत्रित रणशिंग फुंकण्याचा इंडिया आघाडीचा प्रयत्न सफल होताना दिसत नव्हता. राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेच्या समारोपाच्या निमित्ताने इंडिया आघाडीच्या ऐक्याचे दर्शन घडविण्याचा काँग्रेसचा प्रयत्न होता. मात्र, तृणमूल काँग्रेस, डाव्या पक्षांनी यावर बहिष्कार घातल्याने अपेक्षित एकजुटीचे प्रदर्शन घडण्याऐवजी उलट मतभेदांवरच जोरदार चर्चा झडली. त्यामुळे आपापल्या संकटाचा प्रतिकार करण्याच्या निमित्ताने का असेना दिल्लीच्या रामलीला मैदानावर सगळे विरोधक एकत्र आले आणि विरोधकांच्या ऐक्याची वज्रमूठ देशवासीयांना पहायला मिळाली, हे आघाडीच्या दृष्टीने चांगलेच घडले. या शक्तिप्रदर्शनास नैमित्तिक कारण ठरले ते दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची अटक! त्याला झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या अटकेची व ऐन निवडणुकीच्या तोंडावर आयकर विभागाने काँग्रेससह विरोधी पक्षांना दंडाच्या नोटिसा पाठवून त्यांची बँक खाती गोठवण्याची जोड मिळाली! भाजपेतर पक्षांना नेमके काय म्हणायचे आहे आणि ते भाजपविरोधात का लढत आहेत, हे रामलीला मैदानावरून देशभरातील जनतेपर्यंत स्पष्टपणे व एकत्रितपणे पोहोचवण्याची संधी इंडिया आघाडीला या सभेद्वारे साधता आली. २०२४ ची निवडणूक खुली व निष्पक्ष होण्यात सत्ताधारी भाजप जाणीवपूर्वक अडथळे आणत आहे, देशात लोकशाही व्यवस्था टिकवायची असेल तर भाजपची ही दादागिरी थांबवावीच लागेल, केंद्रीय निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था असून तिने भाजपची ही दादागिरी थांबवून विरोधी पक्षांची गळचेपी थांबवली पाहिजे हे विरोधी पक्षाच्या नेत्यांनी या सभेतून देशातल्या जनतेला सांगितले. विरोधकांच्या गळचेपीच्या आरोपांमध्ये तथ्य असणा-या घटना नजीकच्या काळात घडल्याने हे केवळ तथ्यहीन आरोप आहेत असे म्हणता येणार नाही, हे देशातील जनतेलाही ज्ञात आहेच! लोकसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर प्राप्तिकर विभागाला काँग्रेसच्या कर परताव्यातील अनियमिततेची प्रकर्षाने आठवण होते. काँग्रेसची बँक खाती गोठवत क्रमाक्रमाने दंडाची रक्कम वाढविली जाते आणि त्याविरोधात काँग्रेसने न्यायालयात धाव घेतल्यावर 'लोकसभा निवडणूक होईपर्यंत आम्ही कारवाई करणार नाही', अशी साळसूद भूमिका प्राप्तिकर खाते घेते. मग प्राप्तिकर खात्याला हे शहाणपण न्यायालयात आल्यावरच सुचते हा निव्वळ योगायोग समजायचा का? ईडी ही देखील स्वायत्त संस्था.मात्र, दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल व हेमंत सोरेन यांच्या अटकेचे या स्वायत्त संस्थेने साधलेले 'टायमिंग' हा ही निव्वळ योगायोग समजायचा का? केजरीवाल दोषी असतील तर त्यांना त्यांच्या मंत्रिमंडळातील साथीदारांसोबत वर्षभरापूर्वीच अटक का करण्यात आली नाही? असे प्रश्न नक्कीच उपस्थित होतात. भाजप प्रचंड आर्थिक व राजकीय सत्तेच्या बळावर निवडणुकीचे स्वरूप एकतर्फी बदलून टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचा विरोधकांचा आरोप 'आम्ही यंत्रणांच्या कारभारात हस्तक्षेप करत नाही. तुम्ही कायदा मोडता म्हणून तुम्हाला शिक्षा होते', असा साळसूद युक्तिवाद करून उडवून लावण्याचा प्रयत्न सत्ताधारी भाजप करतो आहे. मात्र, घडणा-या घटना विरोधकांचे आरोप अगदीच तथ्यहीन नाहीत हे दाखवून देण्यास पुरेशा आहेत. त्यामुळे सत्ताधारी भाजपला विरोधकांचे आरोप असेच उडवून लावता येणार नाहीत. तर निवडणुकीच्या काळात सत्ताधारी पक्ष निष्पक्ष भूमिका घेत असल्याचे जनतेला प्रत्यक्ष दिसावे लागेल व पटावे लागेल! अन्यथा विरोधक निवडणूक प्रक्रियेवर घेत असलेली शंका योग्यच ठरेल.रामलीला मैदानावरून एकत्रितरीत्या हे प्रश्न जोरकसपणे देशासमोर आणण्यात इंडिया आघाडी यशस्वी ठरली आहे, हे नक्की! त्याचा भाजपच्या कार्यशैलीवर कितपत परिणाम होईल, हा प्रश्न अलहिदा! मात्र, भाजपच्या दादागिरीस समर्थपणे प्रतिकार करण्याची संधी इंडिया आघाडीला आपल्या या ऐक्याच्या प्रदर्शनातून निश्चित साधता येते! इंडिया आघाडी ती कशी साधणार यावर येत्या निवडणुकीचे गणित ठरणार आहे. रामलीला मैदानावर दाखवलेले ऐक्य राज्याराज्यात दाखवण्याची इंडिया आघाडीतील नेत्यांनी इच्छाशक्ती ठेवली तर भाजपचा ही निवडणूक एकतर्फी होणार हे भासवण्याचा मनसुबा धुळीस मिळवला जाऊ शकतो. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी या सभेत हाच प्रश्न उपस्थित केला. 'इंडिया'तील ऐक्य टिकले नाही तर भाजपचा पराभव कसा करणार? या खर्गे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर इंडिया आघाडीतील सर्वपक्षीय नेत्यांनी आत्मचिंतन करायची गरज आहे. असो! तूर्त भाजपच्या विरोधात आम्ही वेगवेगळे निवडणूक लढलो तरी एकच आहोत, हा संदेश मतदारांना देण्यात इंडिया आघाडीला यश आले हे निश्चित!



# अभिनेत्रींची राजकीय इनिंग

सध्या सुरू असलेल्या लोकसभेच्या रणधुमाळीमध्ये बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणावत हिला भाजपातर्फे हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. दुसरीकडे काँग्रेसकडून स्वरा भास्करला उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. याखेरीज भाजपाने मथुरा लोकसभा मतदारसंघातून हेमा मालिनी यांना तिस-यांदा रिंगणात उतरवले आहे. बॉलिवूडमध्ये अशा अनेक अभिनेत्री आहेत ज्यांनी ग्लॅमरची दुनिया सोडून राजकारणात हात आजमावण्याचा विचार केला आणि आता त्यांनी राजकारणी म्हणून ओळख मिळवली आहे. निवडणुकांमध्ये स्टार कॅम्पेनर म्हणून झळकून दमदार कमाई करणा-या अभिनेत्रींनी राजकारणाकडे आपला मोर्चा वळवल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यांचा वेध घेणारा लेख.लिवूड आणि राजकारण यांचे नाते खूप वर्षांपासून चालत आलेले आहे. चित्रपटांमधील अभिनयाच्या माध्यमातून मिळालेल्या स्टारडमचा फायदा घेण्यासाठी सिनेकलावंतांना राजकारणात आणण्यासाठी सर्वच राजकीय पक्ष उत्सुक असतात. निवडणुकांच्या प्रचारसभांमध्ये बॉलिवूडसह दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील कलाकार, भोजपुरी कलाकार यांना स्टार प्रचारक म्हणून आणून मतदारांना आकर्षित करण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये चढाओढ पाहायला मिळते. यामध्ये खास करून अभिनेत्रींना झुकते माप दिले जाते. त्याचबरोबर काही अभिनेत्रींनी निवडणुकांच्या माध्यमातून सक्रिय राजकारणामध्ये प्रवेश केल्याचीही उदाहरणे पाहायला मिळतात. राजकीय पक्षांकडूनही अनेक अभिनेत्रींना निवडणुकांमध्ये उमेदवारी देण्याबाबत उत्सुकता दिसून येते. यंदाच्या लोकसभा निवडणुकीतही राजकारणात रूढ झालेला हा प्रवाह पाहायला मिळत आहे.बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणावत हिला भारतीय जनता पक्षातर्फे हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. कंगनाचा आजवरचा प्रवास रंजक आणि संघर्षमय राहिला आहे. कंगना सधन घरात जन्मली. घरात राजकीय पार्श्वभूमीही होती. पण लहानपणापासूनच अभिनय, कलेची आवड असल्याने तिने घर सोडण्याचा निर्णय घेतला होता. कंगनाचा जन्म हिमाचलच्या मंडी जिल्ह्यात झाला आणि आता याच मतदारसंघात तिला तिकिटही देण्यात आले आहे. कंगनाची आई शाळेत शिक्षिका होती. पण तरीही कंगनाला लहानपणापासून अभ्यासाची फारशी आवड नव्हती. बारावीत ती नापास झाली होती. त्यानंतर हिरोईन व्हायचं म्हणून घर सोडून ती मुंबईत आली. मंडी ते दिल्ली आणि दिल्ली ते मुंबई असे करत कंगना सिनेइंडस्ट्रीत आली आणि आघाडीची नायिका बनली. २००६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'गँगस्टर' सिनेमातून कंगनाने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या सिनेमासाठी तिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पदार्पणाचा फिल्मफेअर पुरस्कारही मिळाला होता. यानंतर वेगवेगळ्या भूमिका करत कंगनाने आपली स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे 'फॅशन' सिनेमातल्या भूमिकेसाठी कंगनाचं प्रचंड कौतुक झालं होतं.या सिनेमासाठी तिला पहिल्यांदा राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला होता. 'क्वीन' सिनेमासाठीही तिला राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आतापर्यंत पाच वेळा तिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. कंगना अनेकदा वादातही अडकली आहे. सुशांतसिंह राजपूत याच्या निधनानंतर तिने बॉलिवूडमधल्या बड्या सेलिब्रिटींवर निशाणा साधला होता. तर मध्यंतरीच्या काळात उद्धव ठाकरे विरुद्ध कंगना असाही वाद रंगला होता. मुंबई महानगरपालिकेने कंगनाच्या ऑफिसवर कारवाई केल्यानंतर कंगनाने 'उद्धव ठाकरे, आज मेरा घर टूटा है, कल तेरा घमंड टूटेगा' असे म्हणत एकेरी शब्दांत त्यांचा उल्लेख केला होता. भारताला खरं स्वातंत्र्य २०१४ मध्ये मिळालं, असं वक्तव्यही मध्यंतरी कंगनाने केलं होतं. त्यानंतर तिने राजकीय मुद्यावर बोलायला सुरुवात केली. भाजपच्या समर्थनार्थ ती अनेकदा बोलताना दिसली. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या अनेकदा तिनं भेटीही घेतल्या होत्या. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून कंगना लोकसभेच्या रिंगणात दिसू शकते अशा शक्यता वर्तवल्या जात होत्या, अखेर त्या ख-या ठरल्या. तसं पाहायला गेल्यास कंगना आणि तिच्या कुटुंबासाठी राजकारण नवीन नाही.कंगनाचे आजोबा सरजू राम मंडी जिल्ह्याच्या गोपाळपूर मतदारसंघातून काँग्रेसचे आमदार होते. आता कंगना भाजपाकडून लोकसभेत प्रवेश करते का हे पाहणे रंजक ठरणार आहे. यंदाच्या निवडणुकीत बॉलिवूडची ड्रीम गर्ल म्हणजेच हेमा मालिनी यांनाही उत्तर प्रदेशातील मथुरा येथून पुन्हा एकदा निवडणूक रिंगणात उमेदवारी देण्यात आली आहे. या लोकसभा मतदारसंघातून २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकांमध्येही हेमा मालिनी यांनी दणदणीत विजय मिळवला होता. २०१४ मध्ये त्यांनी ५,७४,६३३ मते मिळवली होती; तर २०१९ मध्ये ६,७१,२९३ मते मिळवत त्यांनी शानदार विजय नोंदवला. आता यंदा त्या खासदारकीची हॅट्ट्रिक करण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. त्या २००३ ते २००९ या काळात राज्यसभेच्या खासदारसुद्धा होत्या. १९९९ मध्ये हेमा मालिनी यांनी पहिल्यांदा पंजाबमधील गुरुदासपूर येथे लोकसभा निवडणुकीसाठी विनोद खन्ना यांचा प्रचार केला होता. हेमा मालिनी यांच्याप्रमाणेच बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते अनुपम खेर यांच्या पत्नी किरण खेर यांनी २००९ मध्ये भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्या चंदिगडमधून २०१४ मध्ये लोकसभेच्या सदस्य म्हणून निवडून आल्या होत्या. २०१९ मध्ये याच जागेवर पुन्हा त्यांना उमेदवारी देण्यात आली आणि त्यांनी शानदार विजय मिळवला. सिनेअभिनेत्रींप्रमाणेच छोट्या पडद्यावरील मालिका विश्वात आपला स्वतंत्र ठसा उमटवणा-या अभिनेत्री आणि दिग्दर्शक स्मृती इराणी यांनीही राजकारणामध्ये प्रवेश करून समकालीन आणि इतिहासातील सर्वच अभिनेत्रींपेक्षा सरस कामगिरी करून दाखवली. वास्तविक त्यांना पूर्वीच्या काळी बराच संघर्ष करावा लागला.


## माकड चावल्यामुळे माणसाला जीवघेणा संसर्ग, १६ दिवसांपासून मध्ये दाखल... जाणून घ्या प्राणघातक व्हायरसबद्दल



एका व्यक्ती उद्यानात फिरत होती. यावेळी त्याला माकडाने चावले. यानंतर त्या व्यक्तीला दुर्मिळ पण जीवघेणा संसर्ग झाला. आता त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. हा संसर्ग बी व्हायरसमुळे होतो. ही घटना हाँगकाँगमध्ये घडली आहे.हाँगकाँगमध्ये अनेक माकडांमध्ये हा संसर्ग आढळतो. सेंटर फॉर हेल्थ प्रोटेक्शन ने देखील या प्रकरणावर चिंता व्यक्त केली आहे. पीडित व्यक्ती काम शान कंट्री पार्कमध्ये फिरायला गेली होती. या उद्यानाला मंकी हिल असेही म्हणतात. हाँगकाँगमध्ये मानवांमध्ये बी विषाणू संसर्गाची ही पहिलीच घटना आहे.हाँगकाँगमधील संक्रमित व्यक्तीचे वय ३७ वर्षे आहे. २१ मार्चपासून ते यान चाय हॉस्पिटलमध्ये दाखल आहेत. त्याला सतत ताप येत आहे.बी व्हायरसला माकड बी व्हायरस किंवा हर्पेसव्हायरस सिमिया असेही म्हणतात. जेव्हा हा विषाणू माणसाला संक्रमित करतो तेव्हा हे अत्यंत दुर्मिळ आहे. हा विषाणू १९३२ मध्ये सापडला. २०१९ पर्यंत या विषाणूमुळे केवळ ५० जणांना लागण झाली होती. त्यापैकी २१ जणांचा मृत्यू झाला.मॅगी नूडल्स प्रकरणात ९ वर्षांनंतर नेस्ले कंपनीला दिलासा; आता ६४० कोटी भरावे लागणार नाहीत सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन नुसार, आतापर्यंत फक्त एकदाच बी व्हायरस एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरला आहे. २०२१ मध्ये चीनमध्ये बी विषाणूची लागण झालेल्या पहिल्या मानवाचे प्रकरण समोर आले. ही व्यक्ती प्राण्यांची डॉक्टर होती. या संसर्गानंतर एका महिन्यानंतर त्या डॉक्टरचाही मृत्यू झाला. लक्षणे काय आहेत? ताप येणे, थंडी जाणवते, स्नायू दुखणे, थकवा आणि डोकेदुखी नंतर श्वास घेण्यास त्रास, अस्वस्थता, उलट्या, पोटदुखी आणि हिचकी हे या संसर्गाचे लक्षणे आहेत. माकड जिथे चावला किंवा ओरबाडले त्या जागेवर एक डाग येतो आणि खाज सुटते. नंतरच्या टप्प्यात, संसर्गामुळे मेंदू आणि पाठीच्या कण्याला सूज येते. यामुळे भयंकर वेदना होतात. शरीर सुन्न होऊ लागते.

# एक टक्का विरुद्ध इतर

भारतात श्रीमंत आणि त्यांची संपत्ती झपाट्याने वाढत आहे. हा ट्रेंड आजपासून नाही तर २४ वर्षांपूर्वी सुरू झाला आहे. २००० च्या दशकाच्या सुरुवातीपासून भारतामध्ये आर्थिक विषमता सातत्याने वाढत आहे. आता जगप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ थॉमस पिकेटी आणि अन्य तीन अर्थतज्ज्ञांनी सादर केलेल्या एका अहवालानुसार, २०१४-१५ आणि २०२२-२३ दरम्यान भारतात संपत्तीच्या केंद्रीकरणाची प्रक्रिया गतिमान झाल्याचे मत चार अर्थतज्ज्ञांनी मांडले आहे. त्यानुसार देशातील एक टक्का लोकसंख्येकडे देशाच्या उत्पन्नाचा तब्बल २२.६ टक्के वाटा आणि एकूण संपत्तीचा ४०.१ टक्के हिस्सा आहे. ही आकडेवारी श्रीमंत अभिजात वर्ग आणि उर्वरित लोकसंख्येमधील वाढती आर्थिक दरी अधोरेखित करणारी आहे. जागतिकीकरणानंतर आर्थिक विषमता वाढली आहे, ही बाब सातत्याने समोर येत आहे. याबाबत गांभीर्याने विचार न केल्यास अमेरिकेप्रमाणे 'एक टक्का विरुद्ध ९९ टक्के या आंदोलनासारखी स्थिती दिसू शकेल.भारताच्या आर्थिक विकासाचा उद्घोष जागतिक पटलावर चहूबाजूंनी होत असून येणा-या भविष्यकाळाबाबत भारतीय अर्थव्यवस्थेविषयी अत्यंत सकारात्मक, आशावादी भाकिते वैश्विक पतमानांकन संस्थांकडून केली जात आहेत. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्यासारख्या दिग्गज संस्थाही भारताच्या आर्थिक विकासाची प्रशंसा करताना येणा-या काही वर्षांत भारत हा जगातील तिस-या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनेल अशा प्रकारचे अंदाज व्यक्त करत आहेत. या सर्व सकारात्मक गोंगाटामध्ये एक काहीसा चिंताजनक आणि आत्मपरीक्षण करायला लावणारा आर्थिक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला असून त्याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. हा अहवाल पॅरिस स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे प्रख्यात अर्थतज्ज्ञ थॉमस पिकेटी, हार्वर्ड केनेडी स्कूलचे लुकास चॅन्सेल आणि न्यूयॉर्क विद्यापीठाचे नितीन कुमार भारती यांनी लिहिला आहे. या अहवालामध्ये भारतात वाढत चाललेल्या आर्थिक विषमतेविषयीचे आणि संपत्तीच्या केंद्रीकरणाविषयीचे तपशील मांडण्यात आले आहेत.वर्ल्ड इनइक्वॅलिटी लॅबतर्फे प्रकाशित केलेल्या या अहवालानुसार भारतातील एक टक्का अतिश्रीमंत लोकसंख्येचा देशाच्या उत्पन्नातील वाटा हा अमेरिका, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका यांसारख्या समृद्ध राष्ट्रांच्या तुलनेत अधिक आहे. 'इन्कम अँड वेल्थ इनइक्वॅलिटी इन इंडिया १९९९-२०२३ : द राईज ऑफ द बिलियनेअर राज' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेल्या या अहवालातील निष्कर्षांनी आर्थिक आणि सामाजिक क्षेत्राला



धक्का दिला आहे. २०१४-१५ आणि २०२२-२३ दरम्यान भारतात संपत्तीच्या केंद्रीकरणाची प्रक्रिया गतिमान झाल्याचे मत चार अर्थतज्ज्ञांनी मांडले आहे. त्यानुसार देशातील एक टक्का लोकसंख्येकडे देशाच्या उत्पन्नाचा तब्बल २२.६ टक्के वाटा आणि एकूण संपत्तीचा ४०.१ टक्के हिस्सा आहे. ही आकडेवारी श्रीमंत अभिजात वर्ग आणि उर्वरित लोकसंख्येमधील वाढती आर्थिक दरी अधोरेखित करणारी आहे.संपत्तीच्या अतिरेकी केंद्रीकरणाची ही स्थिती सामाजिक कल्याण आणि प्रशासनावरील परिणामांबद्दल महत्त्वपूर्ण चिंता निर्माण करणारी आहे. मूठभरांच्या हाती वेगाने होत असलेल्या संपत्तीच्या संचयामुळे समाज आणि सरकार या दोघांवर प्रतिकूल प्रभाव पडू शकतो, लोकशाही आदर्शांना धोका निर्माण होऊ शकतो आणि सामाजिक विषमता वाढू शकते, अशी भीती या अर्थतज्ज्ञांनी मांडली आहे. या अहवालात भारतातील अब्जाधीश वर्गातील संपत्ती जमा करण्याच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्यात आला आहे. १९९१ मध्ये १ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त संपत्ती असलेल्या व्यक्तींची संख्या एक इतक होती; ती वाढून २०२२ मध्ये १६७ इतकी झाली आहे. विशेषत: गेल्या दशकभरामध्ये ही वाढ अतिशय झपाट्याने झाली आहे. आजघडीला या अतिश्रीमंतांच्या संपत्तीचा भारताच्या निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २५ टक्क्यांवर पोहोचला आहे.भारतातील वाढत्या उत्पन्नविषमतेची ही समस्या दूर करण्यासाठी अनेक धोरणात्मक उपायांची शिफारस या अहवालामध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार उत्पन्न आणि संपत्ती या दोहोंसाठी कर संहितेची पुनर्रचना, आरोग्य, शिक्षण आणि पोषण यामध्ये व्यापक सार्वजनिक गुंतवणूक यांचा समावेश आहे. देशातील सर्वांत श्रीमंत कुटुंबांच्या निव्वळ संपत्तीवर 'सुपर टॅक्स' लागू करण्याचा मुद्दा त्यामध्ये अनुस्यूत आहे. अशा उपाययोजनांमुळे महत्त्वाच्या सार्वजनिक गुंतवणुकीसाठी आर्थिक अवकाश निर्माण होण्याबरोबरच संसाधनांच्या अधिक न्याय्य वितरणासही हातभार लागेल, असे अहवालकर्त्यांचे म्हणणे आहे.देशातील अब्जाधीशांच्या वाढीचा खुलासा करणारा अहवाल अतिश्रीमंत वर्गाचे वर्चस्व दर्शवणारा आहे.१९८० च्या दशकात देशातील आर्थिक विषमता कमी झाली होती. परंतु जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या युगात उदारमतवादी आर्थिक धोरणांमुळे उत्पन्नातील विषमताच वाढीस लागली आहे, हे वास्तव नाकारता येणार नाही. या पार्श्वभूमीवर देशाच्या कररचनेत सुधारणा व्हावी, अशी मागणी अनेक दिवसांपासून होत आहे. अतिश्रीमंत वर्गाच्या उत्पन्नावर आणि मालमत्तेवर अधिक दराने करआकारणीचा मुद्दा सातत्याने मांडूनही त्याचा गांभीर्याने विचार झाला नाही. त्यामुळे संसाधनांच्या बेसुमार शोषणाची प्रक्रिया सुरू राहिली. थॉमस पिकेटी यांच्या अहवालात असे म्हटले आहे की, २०२३ या आर्थिक वर्षात देशातील सर्वांत श्रीमंत १६७ कुटुंबांच्या एकूण संपत्तीवर दोन टक्के सुपर टॅक्स लावला असता, तर देशाच्या एकूण उत्पन्नात ०.५ टक्क्यांनी वाढ झाली असती. थॉमस पिकेटी यांचा हा अहवाल आणि ऑक्सफॅमचा गतवर्षीचा अहवाल यामध्ये ब-याच अंशी साधर्म्य आहे. भारतामधील २१ अब्जाधीशांकडे देशातील ७० कोटी भारतीयांपेक्षा जास्त संपत्ती असल्याचा अहवाल ऑक्सफॅमने गतवर्षी दिला होता. संपूर्ण जगात श्रीमंत आणि गरीब यांमधील अंतर वाढत जात असताना भारतासारख्या विकसनशील देशांमध्येही ही तफावत प्रकर्षाने दिसून येत आहे. २०२० मध्ये कोरोना महामारी सुरू झाल्यानंतर नोव्हेंबर २०२१ पर्यंत अनेक भारतीयांना आपल्या रोजगारासंबंधी समस्या निर्माण झाल्या. काहींच्या नोक-या गेल्या. अनेकांनी आपली बचत गमावली. मात्र दुस-या बाजूला भांडवलदारांच्या संपत्तीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत गेली.

# अति तिथं माती! मौजमजा करण्याच्या क्षणिक मोहात अडकला अन्...



नरेंद्र राठोड, ठाणे सोन्याचे अंडे देणार्या कोंबडीची गोष्ट सर्वांनाच माहिती आहे. अति हाव माणसाला कशी मातीत घालते, हा या गोष्टीचा मथितार्थ! एका तरुणाचं आहे त्या नोकरीत बरं चाललं होतं; पण त्याला त्यापेक्षा भलं अपेक्षित होतं आणि ते साध्य करण्यासाठी त्याने सोन्याचं अंडे देणारी कोंबडी कापली आणि सगळंच मुसळ केरात गेलं आणि हा कारागृहात ठाण्यातील रेल्वे स्थानकासमोरच असलेल्या चांगल्या सोसायटीत राहणारा राहुल जयंतीलाल मेहता हा पस्तिशीतला सेल्समन. नौपाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या डॉ. मुस रोडवरील एका मोठ्या ज्वेलर्स दुकानात उत्तम पगाराची नोकरी तो करायचा. त्याचे काम उत्तम व प्रामाणिक असल्याने दुकान मालकाचा अल्प काळातच त्याच्यावर बर्यापैकी विश्वास बसला होता. तो फक्त दुकानात राहूनच नव्हे, तर बाहेरच्या व्यापार्यांकडे देखील दागिन्यांची खरेदी-विक्री करू लागला होता. मालक विश्वासाने त्याच्या हातात करोडोचे दागिने देऊ लागले होते. एकीकडे चांगली नोकरी व दुसरीकडे सुखी परिवार, असे आनंदी जीवन असताना देखील राहुल मीरा रोड येथे राहणार्या एका तरुणीच्या प्रेमात पडला. या तरुणी सोबतची मैत्री त्याला आवडू लागली. हळूहळू तो मैत्रिणीला सोबत घेऊन मौजमजा करू लागला. साहजिक या मौजमजेवर त्याचा अमाप पैसा खर्च होऊ लागला व पगाराचे पैसे कमी पडू लागले. पैशाची कमतरता भासत असल्याने तो पैसे मिळवण्यासाठी धडपड करू लागला.अन् येथूनच त्याचे पाऊल वाईट मार्गावर पडले. त्याने सेल्समनचे काम करीत असलेल्या ज्वेलर्स दुकानात चोरी करायचे ठरवले. संधी मिळेल तसे तो दुकानातून व त्यास विक्री करण्यास दिलेल्या दागिन्यांतून छोटी-मोठी चोरी करू लागला. एक-दोन वेळा चोरी करून देखील चोरीचा प्रकार कुणाच्याही लक्षात आला नाही, हे बघून तर त्याचे मनोबल आणखी वाढले.ज्वेलर्स दुकानातून मोठी चोरी करायची व परराज्यात जाऊन मैत्रिणीसोबत स्थायिक व्हायचे, असे स्वप्न आता राहुल रंगवू लागला होता. त्याच्या या स्वप्नांना त्याच्या मैत्रिणीने अधिकच हवा दिली. त्याने मोठी चोरी करण्याच्या योजनेवर काम सुरू केले व संधीची वाट बघू लागला. अखेर ९ मार्च रोजी त्यास ही संधी मिळाली. राहुल सेल्समन असलेल्या ज्वेलर्स दुकान मालकाने त्यास ३८ सोन्याचे हार, २४ जोडी कर्णफुले, ५ चैन, बाजुबंद असे १ कोटी ५ लाख रुपये किमतीचे दागिने विक्री करण्यासाठी दिले होते. हे दागिने विक्री करून त्याचे पैसे दुकानात त्यास जमा करायचे होते.मात्र, राहुल दागिने विक्री करण्यास गेला तो परत न येण्यासाठी. मालकाचा त्याच्यावर विश्वास असल्याने राहुल एक-दोन दिवसांत परत येईल, असा मालकाने समज करून त्याची वाट बघितली. मात्र, दहा दिवस उलटून देखील तो परतला नाही. या काळात त्याने आपला फोन देखील बंद ठेवला होता. अखेर दुकान मालकाने २५ मार्च २०२४ रोजी नौपाडा पोलिस ठाण्यात दागिने चोरीची फिर्याद दाखल केली. गुन्हा दाखल होताच नौपाडा पोलिसांनी आरोपीचा शोध घेतला असता, तो ८ मार्चपासून घरी परतला नसल्याचे समोर आले. त्याच्या पत्नीने नौपाडा पोलिसांत १५ मार्च रोजी त्याच्या मिसिंगची तक्रार दाखल केल्याचे देखील समोर आले.त्यानंतर पोलिसांनी त्याच्या मोबाईल लोकेशनच्या आधारे शोध घेतला असता तो मीरा रोड, मुंबई, इंदौर, गुजरात अशा वेगवेगळ्या ठिकाणी फिरत असल्याचे आढळून आले. त्याला आता आपले स्वप्न पूर्ण झाले, असे वाटू लागले होते. याच दरम्यान त्याने आपल्या मैत्रिणीशी मोबाईलवरून संपर्क साधला अन् तिला भेटण्यासाठी मीरा रोड येथे येणार माहिती फोनवरून दिली. त्याला वाटत होते की सगळं आपल्या प्लॅनप्रमाणे होत आहे. पण, आपण आखलेला प्लॅन निव्वळ बेवकुफी असून, आपल्या प्रत्येक हालचालीवर पोलिस नजर ठेवून आहेत, याची त्याला साधी कल्पना देखील आली नसावी.२६ मार्च रोजी तो त्याच्या मैत्रिणीला भेटण्यास मीरा रोड येथे आला. त्याच वेळी त्याच्या मागावर असलेल्या पोलिसांनी त्यास सापळा रचून मीरा रोड परिसरातून अटक केली. त्याच्या ताब्यातून अपहार केलेल्या दागिन्यांपैकी ६२ लाख १० हजारांचे दागिने हस्तगत करण्यात आले. इतर दागिने मौजमजा करण्यासाठी विक्री केल्याचे चौकशीतून समोर आले आहे. एक चांगला सेल्समन मौजमजा करण्याच्या क्षणिक मोहात अडकला अन् थेट गजाआड जाऊन पोहोचला.

# महाबळेश्वरला जाताना 'ही' ठिकाणेही नक्की पाहा!


भिलार (ता. महाबळेश्वर) हे केवळ स्ट्रॉबेरीचे गाव म्हणूनचं नाही तर पुस्तकांचे गाव म्हणूनही ओळखले जाते. याठिकाणी सोलो ट्रीप किंवा फॅमिलसहित जाता येईल. खरंतर बच्चे कंपनीला भिलार हे गाव नक्की दाखवा. भिलार हे निसर्गसंपन्न गाव आहे. भिलार गावातील प्रत्येक घरात काही ना काही साहित्य हे तुम्हाला पाहायला मिळणारचं. शिवाय येथून काही अंतरावर लिंगमळा धबधबा आहे, जिथे तुम्ही पावसाळ्यामध्ये भेट देऊ शकता. महाबळेश्वरला पावसाळ्यात आणि हिवाळ्यात भेट दिला तर तो तुम्हाला धुक्याच्या चादरीमध्ये लपटलेला दिसेल. वाई, धोम धरण, ठोसेघर धबधबा पाहत वृक्षराजींनी वेढलेला निसर्ग, पसरणी घाट ओलांडून हलक्या हलक्या सरी झेलत महाबळेश्वरची सैर करणं, स्वर्गाहून कमी सुख नाही. हिरव्यागार वेढलेल्या धरतीवर दाडून आलेले काळे मेघ अन रिमझिम पाऊसधारा, ओलेचिंब झाडे, अंगावर शहारे आणणारा गारवा असा सुंदर प्रवास तुम्हाला याठिकाणी अनुभवता येईल. पाचगणीपासून फक्त ५ किलोमीटर अंतरावर पाचगणी ते महाबळेश्वर अंतरावर भिलार हे गाव आहे. गाव तसं सुंदर. अनेक माहिती फलकांना आणि सुंदर चित्रांनी रेखाटलेल्या घरांच्या भिंती तुमचे स्वागत करतात. जाता जाता स्ट्रॉबेरी शेती आणि रंगबेरंगी फुलांची झाडे पटकन लक्ष वेधून घेतात.शहरातील इमारतींप्रमाणे येथील सुंदर इमारती दिमाखात उभ्या असलेल्या दिसतात. घरांचे ग्रंथालय भिलारमध्ये पुस्तकांचे गाव ही संकल्पना महाराष्ट्र सरकारने साकारली आहे.लोकसाहित्य, कथा, क्रीडा व विविध लोकप्रिय, कविता, कादंबरी, ग्रामीण कथा, चरित्रे, आत्मचरित्रे, निसर्ग, पर्यावरण, भटकंती, बोलकी पुस्तके व प्रकल्प कार्यालय, महाराष्ट्र प्रदेश, मराठी व संस्कृती, विज्ञान, परिवर्तन चळवळ, समाजसुधारक व सुधारणांचा इतिहास, ललित गद्य आणि वैचारिक पुस्तके, बालसाहित्य, दिवाळी अंक, नाटक व चित्रपट, चित्रमय पुस्तके, स्पर्धा परीक्षा, नियतकालिके व साहित्यिक माहितीफलक, इतिहास, विनोदी, छत्रपती शिवाजी महाराज, शिवकालीन इतिहास व गडकिल्ले, वर्तमानपत्रे व साप्ताहिके, स्त्री साहित्य, संत साहित्य, विविध कलांविषयक,




साहित्यिक माहितीफलक.घरामंधील ग्रंथालये ही वरील सर्व साहित्य तुम्हाला भिलारमधील नागरिकांच्या घरांमध्ये अगदी मोफत वाचायला मिळते. घरांच्या पहिल्या खोलीत अनेक साहित्य संपदा, पुस्तके पर्यटकांना अगदी मोफत वाचण्यासाठी ठेवलेली आहेत.तुम्ही याठिकाणी बसून तुम्हाला हवी ती पुस्तके वाचू शकता. १५ ते १७ हजारांच्या जवळपास विविध साहित्य याठिकाणी उपलब्ध आहे.घराच्या भिंतीवर रेखाटलेले चित्र प्रत्येक घरात ३०० ते ४०० पुस्तके पाहायला मिळतील. कोणीही वाचक तिथे गेला की हवं ते पुस्तक घेऊन वाचू शकतो.

# येडगेवाडी नळपाणी योजनेची रत्नागिरी जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी किर्तीकिरण पूजार यांनी केली पाहणी; पाणी साठ्याबाबतच्या केल्या सूचना

संगमेश्वर/ प्रतिनीधी: संगमेश्वर तालुक्यातील कुटगिरी येडगेवाडी नळपाणी योजना कामाची रत्नागिरी जिल्हा परीषद मुख्य कार्यकारी अधिकारी किर्तीकिरण पूजार यांनी शुक्रवारी पाहणी केली. यावेळी त्यांनी येडगेवाडी येथील योजनेसाठी खोदलेल्या विहीरीची पाणी पातळी पाहिली तर प्रस्तावीत पाचांबे गायकवाडवाडी येथील विहीरीच्या जागेची ही पाहणी केली. येडगेवाडीडीतील जिल्हा परिषद मालकीच्या विहीरीची पाहणी करुन येथील विहीरीची पाणी पातळी तपासण्याचे आदेश या पाहणी दौ–यात दिले तर नविन विहीर खोदकाम झालेल्या विहीरींची घेण्याच्या सूचना पाणी पुरवठा अधिका–यांना दिल्या आहेत. एप्रिल अखेरपर्यंत सर्व तपासण्या पुर्ण करुन तसा अहवाल



सादर करण्याच्या सूचना या पाहणी दौ–यावेळी दिल्या. संगमेश्वर ( देवरुख ) पाणी पुरवठा उप अभियंता अविनाश जाधव यांनी दि.२९ मार्च २०२४ रोजी येडगेवाडी नळपाणी योजना कामातील विहीरीची घेतलेली आहेत. या टेस्टमध्ये दिवसाला ३५०० लिटर पाणी उपलब्ध होत असल्याचा अहवाल कनिष्ठ भुवैज्ञानिक यांना सादर केलेला आहे. येडगेवाडीची दररोज ची पाण्याची मागणी ६३००० लिटर एवढी असताना दिवसाला ३५०० लिटर पाणी पुरेसे नसल्याचा अहवाल देण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमिवर रत्नागिरी जिल्हा परीषद मुख्य कार्यकारी अधिकारी किर्ती किरण पूजार यांनी पाहणी केल्याने पुन्हा होणा–या मध्ये किती पाणी साठा उपलब्ध होतो याची उत्सुकता येडगेवाडीकरांमध्ये आहे. रत्नागिरी जिल्हा परीषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. किर्ती किरण पुजार यांनी शुक्रवारी केलेल्या येडगेवाडी नळपाणी योजना पाहणी दौ–याच्या वेळी गायकवाडवाडी येथील विहीरीच्या जागेची पाहणी केली. यावेळी जिल्हा परीषद उप मुख्य कार्यकारी ( पा व स्व ) अधिकारी श्री. राहूल देसाई, श्री. संतोष येडगे, पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता सौ.मयुरी पाटील, संगमेश्वर ( देवरुख ) पंचायत समिती गटविकास अधिकारी श्री.भरत चौगुले, संगमेश्वर ( देवरुख ) पाणी पुरवठा शाखा अभियंता आर. एल. लठाड, राजिवली ग्रामपंचायत सदस्य श्री. रमेश येडगे, राजिवली पोलिस पाटील श्री. संदीप कदम, राजिवली ग्रामपंचायत ग्रामसेवक श्री.सुनिल जाधव, नळपाणी योजना ठेकेदार श्री. प्रमोद महाडिक आणि येडगेवाडीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

# जागृती शुगरचे ७ लाख मे. टन उसाचे गाळप

लातूर : प्रतिनिधी चालु गाळप हंगामात जागृती शुगर अँड अलाइंड इंडस्ट्रीज लिमिटेडने राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याच्या अध्यक्षा तथा कार्यकारी संचालक सौ गौरवीताई अतुल भोसले देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ७ लाख २ हजार ३०९ मेट्रिक टन उसाचे यशस्वी गाळप केले असून कारखान्याने पूर्ण क्षमतेने कारखाना चालवून कार्यक्षेत्रातील उसाचे गाळप ३१ मार्च अखेर पुर्ण केले आहे.राज्यात उस उत्पादक शेतक–यांना एफ. आर. पी पेक्षा अधिक भाव देणा–या व खाजगी साखर उद्योगात भरारी घेत असलेल्या लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईंड इंडस्ट्रीजच्या चालु गाळप हंगामातील सांगता समारोप कारखानास्थळी विधिवत पूजन कारखान्याचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सांगता सोहळयास कारखान्याचे सरव्यवस्थापक येवले गणेश, रेणा साखर कारखान्याचे संचालक संभाजी रेड्डी, जागृती शुगरचे खाते प्रमुख आर. के. कदम, अतुल दरेकर, विलास पाटील, जी. पी. जाधव, एस. व्ही. वाकडे, लक्ष्मण बिराजदार यांच्यासह मालबा घोणसे अधिकारी, कर्मचारी, कामगार मोठया संख्येने उपस्थित होते.यावर्षी उसाचे गाळप सुरू असताना पावसाचे प्रमाण कमी तसेच अवर्षनग्रस्त परीस्थिती व उसाचे क्षेत्र वाढल्याने उस तोडणी लांबणीवर पडेल असे चित्र सगळीकडेच होते. मात्र जागृती शुगरचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी उस उत्पादक शेतक–यांना कार्यक्षेत्रातील उसाचे संपूर्ण गाळप मार्च अखेर पूर्ण करण्याच्या सूचना कारखाना प्रशासनास दिल्या होत्या. तसेच उस उत्पादक शेतक–यांना काळजी करू नका आपला सर्वांचा उस गाळप होईल असे आश्वस्थ केले होते. त्यादृष्टीने अत्यंत चांगले नियोजन करून कारखाना प्रशासनाने सर्व उस उत्पादक शेतक–यांच्या ऊसाचे गाळप ३१ मार्च अखेर गाळप पुर्ण करण्यात आले आहे. त्यामुळें जागृती शुगर कार्यक्षेत्रातील देवणी, शिरूर अनंतपाळ, निलंगा, उदगीर, चाकुर तालुक्यातील ऊस उत्पादकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## दैनिक महावृत्त दणक्याने पाणी गळती रोखण्यास यश.



मुंबई/शहामत :–सविस्तर बाब अशी दैनिक महावृत्त या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०४ एप्रिल,२०२४ रोजी कांदिवलीतील दामूनगर मुख्य रस्त्यावर पाणी गळतीमुळे रस्त्यावर तळे या शीर्षकाअंतर्गत बातमी प्रकाशित झाल्यावर मुंबई महानगर पालिका आर/दक्षिण जल विभागातील अधिकारी वर्गाने तातडीने दखल घेत सहा इंच पाईप लाईनची खोदकाम करत नवीन पोरशन टाकून पाणी गळती थांबविण्यात आले. यामुळे तेथे स्थानिक रहिवासी व पादचारी यास दिलासा मिळाला ..
मी वंचित बहुजन आघाडी कार्यकर्ता व पत्रकार या नात्याने तेथील स्थानिकांनी माझे व दैनिक महावृत्त या वृत्तपत्राचे आभार व्यक्त केले...

# लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे १६ एप्रिल पासून विविध खेळांचे मोफत उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर

## १५ एप्रिलपर्यंत नाव नोंदणी करण्याचे आवाहन

लातूर, दि. ०६ : क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि लातूर जिल्हा क्रिडा प्रशिक्षण केंद्राच्यावतीने क्रीडा संघटना, अकॅडमीमार्फत १६ ते २५ एप्रिल, २०२४ या कालावधीत विविध खेळांचे सर्व वयोगटातील विद्यार्थी खेळाडूंसाहती मोफत क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर सन २०२४–२०२५ च्या स्पर्धेच्या पूर्वतयारी लक्षात घेवून घेण्यात येणार आहे. तसेच शिबीरामध्ये शासनाचे क्रीडा मार्गदर्शक तसेच संघटना, इतर अकॅडमीचे तज्ज्ञ क्रीडा मार्गदर्शक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू व तज्ज्ञ पदाधिकारी यांच्याद्वारा खेळनिहाय तंत्रशुध्द प्रशिक्षण देण्यात येणार आहे.जिल्हा क्रीडा संकुल येथे क्रिकेट, खो–खो, कुस्ती, मैदानी, रायफल शुटींग, लॉन टेनिस, जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब, योगा, व्हॉलीबॉल, फुटबॉल, बॅडमिंटन, बॉक्सिंग, ज्युदो, कराटे, स्केटींग, बेसबॉल, सॉफ्टबॉल इत्यादी खेळांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच अहमदपूर येथे तलवारबाजी, सायकलिंग, शुटिंग बॉल, रग्बी, आट्यापाट्या, कबड्डी, बास्केटबॉल, हॅण्डबॉल, फ्लोअर बॉल इत्यादी खेळांचे, उदगीर येथे फुटबॉल, व्हॉलीबॉल, तर मुरुड येथे वुशु., व्हॉलीबॉल, बॉक्सिंग, क्रिकेट, बॅडमिंटन इत्यादी खेळांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.प्रशिक्षण शिबीर नि:शुल्क असून विद्यार्थी, खेळाडू यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथे क्रीडा मार्गदर्शक जयराज मुंडे (भ्रमणध्वनी क्र. ८२७५२७३९१७) आणि चंद्रकांत लोदगेकर (भ्रमणध्वनी क्र. ९८३४९८८२३९) यांच्याकडे १५ एप्रिल, २०२४ पर्यंत आपली नाव नोंदणी करावी. जिल्ह्यातील विविध शाळेतील क्रीडा शिक्षक, मुख्याध्यापक व पालक यांनी जास्तीत जास्त मुलांना या उन्हाळी प्रशिक्षण शिबीराचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.

# तंत्रज्ञान ही शेतक–यांसाठी संजीवनी



लातूर : प्रतिनिधी एकविसाव्या शतकात आज प्रत्येकाकडे मोबाईल, टॅबलेट उपलब्ध आहे. रोजच्या दैनंदिन व्यवहारासोबतच शेतक–यांनीही शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास तंत्रज्ञान ही शेतक–यांसाठी संजीवनी ठरेल असे मत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणि यांनी व्यक्त केले. कृषि महाविद्यालय, लातूर येथे कुलगुरू डॉ. इंद्र मणि यांनी विविध उपक्रमांना तसेच रासायनिक शेतीतून टप्या टप्याने एकात्मिक शेतीकडे वाटचाल या प्रकल्पास भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, डॉ. विश्वनाथ कांबळे, डॉ. दिनेशसिंह चौहान, डॉ. प्रशांत करंजीकर, डॉ. व्यंकट जगताप, डॉ. संतोष कांबळे, डॉ. विजय भामरे, डॉ. राजेश शेळके, डॉ. ज्योती देशमुख, डॉ. अनंत शिंदे, डॉ. पद्माकर वाडीकर, डॉ. अनिलकुमार कांबळे, डॉ. विनोद शिंदे, डॉ. सुनीता मगर, डॉ. ज्ञानेश्वर सुरडकर, डॉ. दयानंद मोरे, डॉ. संघर्ष शृंगारे, डॉ. अजित पुरी, भगवान कांबळे, राहुलदेव भवाळे, देविदास चामणीकर इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.कृषि महाविद्यालय हे नेहमी शेतक–यांना त्यांच्या समस्या निराकरण करणारा सच्चा दोस्त वाटावा. याप्रकारे महाविद्यालयाने आगामी काळातही अशीच वाटचाल करावी याकरिता शुभेच्छा देत डॉ. मणि यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून त्यांना शैक्षणिक प्रगतीविषयी मार्गदर्शन केले. तसेच कार्यानुभवातून शिक्षण या उपक्रमाच्या माध्यमातून निर्मित विविध वस्तूंची पाहणी करून त्यांचे कौतुक केले.

# तापमानाचा कहर, दुचाकीचा कोळसा

लातूर : प्रतिनिधी लातूर शहर व परिसराच्या तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे. शनिवारी तापमानाचा पारा ३९ अंशसेल्सिअसपेक्षास्त होता. सूर्य आग ओकत होता. त्यामुळे येथील जिल्हा न्यायालयासमोरी रोडवर एम. एच. २४, बीई ०८४५ या क्रमांकाची दुचाकी जळून कोळसा झाली. चालत्या दुचाकीतून धुर निघाला आणि पाहता पाहता दुचाकी आगीच्या लोळात जळून खाक झाली.सध्या सूर्य आग ओकत असल्यामुळे तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. तापमानाने चाळीसी घाठली आहे. एप्रिल, मे महिन्यात उष्णतेची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. सकाळी सूर्योदयापासूनच उन्हाचा तडाखा सुरु होतो. दुपारी उन्हाच्या झळांनी जीव कासावीस होत आहे. यंदा मार्च महिन्यापासून



जिल्ह्यात कमाल तापमानात वाढ झाली आहे. मार्च महिन्यात ३८ अंशाच्या पुढे तापमान सरकण्यास सूरुवात झाली. ३० मार्चपासून ६ एप्रिलपर्यंत ३८ ते ३९ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले आहे. ज्ञानेश्वर सूर्यवंश दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज चौकातून महात्मा गांधी चौकाकडे सदर दुचाकीवरुन निघाले होते. चालत्या दुचाकीतून धुर निघत असल्याचे कोणीतरी सूर्यवंशी यांच्या लक्षात आणुन दिले. त्यांनी तत्काळ दुकची रस्त्याकडेला घेऊन थांबवी. पाहता पाहता दुचाकी जळून खाक झाली असून अग्निशन दलाने तत्काळ घटनास्थळी पोहोचून दुचाकीला लागलेली आग आटोक्यात आणली परंतू, तोपर्यंत दुचाकी पुर्णत: जळून भस्म झाली होती.

# १२५० भाविकांनी घेतली उपासक दिक्षा

लातूर : प्रतिनिधी जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांचा पादुका दर्शन सोहळा शनिवारी दि.६ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला यावेळी जवळपास २५ ते ३० हजार पेक्षा जास्त भाविक भक्त्त उपस्थित होते. यावेळी १२५० भाविकांनी उपासक दिक्षा घेतली. सकाळी ९.३० ते ११.३० शोभायात्रा काढण्यात आली या शोभायात्रेत रथामधे जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या सिध्द पादुका व प्रतीमेच्या समोर कलश धारी महीला, भगवा धारी लेझीम पथक, विविध फलक, ध्वजधारी पुरुष, महिला व भजनी मंडळ सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी १२ ते १.३० वाजता गुरु पुजन व महाआरती करण्यात आली. १.३० ते ३ नाणीज पिठाच्या ज.न.म. प्रवचनकार अंजलीताई निकम यांचे अमृततुल्य असे प्रवचन झाले.या प्रवचनात आध्यात्म, भक्ती, विज्ञान यावर प्रवचन झाले. यावेळी १२५० भाविकांनी उपासक दिक्षा घेतली, दुपारी ३ ते ६.३० जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांच्या पादुका दर्शनाचा लाभ भाविकांनी घेतला तसेच सायंकाळी ६.३० वाजता जगद्गुरु श्रींच्या पादुकांवर पुष्पवृष्टी करुन सोहळयाची सांगता करण्यात आली. यावेळी सर्व भाविकांसाठी पिण्याचे थंड पाणी व महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. या कार्यक्रमास राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, संजय निलेगावकर, देविदास काळे, सुनील मलवाड, डॉ. शिवाजी काळगे व कार्यकर्ते उपस्थित होते. या सोहळ्यास स्व–स्वरुप संप्रदाय सेवा समिती पदाधिकारी व सर्व भक्त्तगणांनी परिश्रम घेतले.



# राज ठाकरे चिंतनात

मुंबई : आम्ही शांत नाही. लोकसभा निवडणुकीबाबत राज ठाकरे हे पाडव्याच्या सभेत निर्णय जाहीर करतील. पक्षाने निर्देश दिले आहेत की याबाबत फक्त राज ठाकरे निर्देश देतील. आम्ही सगळीकडे फिरतो, ही निवडणूक मोठी किचकट आणि गुंतागुंतीची आहे. राज ठाकरे याबाबत चिंतन करत असतील. राज ठाकरे जेव्हा शांत असतात तेव्हा जास्त चिंतन करत असतात असे मनसे नेते प्रकाश महाजन यांनी म्हटले आहे.मीडियाशी बोलताना प्रकाश महाजन यांनी लोकसभा निवडणुकीसाठी मनसेची तयारी आणि एकंदरीत घडामोडींबाबत भाष्य केले. तसेच कॉँग्रेसवरही निशाणा साधला. कॉँग्रेस हे मोडकळीस आलेले घर आहे. कॉँग्रेसमधून बाहेर पडण्यासाठी गर्दी होत आहे. कॉँग्रेसचे दार चिंचोळे आहे त्यामुळे तिकडे बाहेर पडताना चेंगराचेंगरी सुरू आहे. दारुण पराभव होऊ नये यासाठी उभे राहायला कुणी तयार नाही, असा टोला प्रकाश महाजन यांनी लगावला.



# रायगव्हाण प्रकल्पामधून पाण्याचा उपसा

लातूर : प्रतिनिधी लातूर तालुक्यातील अनेक गावांना रायगव्हाण मध्यम प्रकल्पातून पाणी पुरवठा होतो. सध्या उन्हाळयामुळे या प्रकल्पातील पाणी कांही शेतकरी शेतीला वापरत आहेत. त्यामुळे प्रकल्पात अत्यंत कमी पाणी शिल्लक राहिल्याने प्रकल्पातील पाण्याचा होणारा उपसा थांबला नाही, तर नागरीकांना उन्हाळयात तीव्र पाण्याची टंचाई जाणार आहे. जिल्हा प्रशासनाने नागरीकांना प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याच्या सुचना असतानाही रायगव्हाण प्रकल्पातून पाण्याचा जोरदारपणे उपसा सुरू आहे. या पाणी उपशाला निर्बंध लागणार का असा प्रश्न निर्माण झाला आहे.लातूर तालुक्यातील रायगव्हाण प्रकल्पातून पूर्वी पाठाद्वारे पाणी पुरवठा



शेतीसाठी केला जात होता. कालांतराने सदर यंत्राना कमी पाणीसाठयामुळे मोडकळीस आली. या प्रकल्पातून सध्या मुरूड, गाधवड, पिंपळगाव आंबा, वाडीवाघोली, भिसेवाघोली, मसला, माटेफळ, खुंटेफळ आदी गावांच्या पाणी पुरवठयाच्या योजना कांही सुरू आहेत. तर कांही कार्यान्वीत होण्याच्या मार्गावर आहेत. तर कांही गावांनी मागणी केली आहे. रायगव्हाण प्रकल्प मधून सध्या शेतकरी विद्यूत मोटारी व ट्रॅक्टर द्वारे पाण्याचा उपसा करत आहेत. या प्रकल्पातील पाणी खुपच कमी झाल्याने असाच उपासा सुरू राहिल्यास पुढील दहा–पंधरा दिवसांत पाणी संपून जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर पाणी पुरवठा असलेल्या योजनांच्या गावातील नागरिककाना पाणी मिळण्याची शक्यता खूपच कमी आहे.प्रकल्पातील पाणी उपसा बंद करावा.रायगव्हाण प्रकल्प मधून परिसरातील ५० गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो. प्रकल्पातील आरक्षीत पाणीसाठयाचा शेतीच्या पिकासाठी शेतकरी उपासा करताना दिसून येत आहेत. सध्या प्रकल्पाच्या परिसरातील गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जानवत असल्याने होणारा पाणी उपसा थांबवल्यास पुढील काळात पाणी टंचाई जानवणार नाही, असे निवेदन भिसेवाघोली ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. स्वयंम वायाळ यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

# अवैद्य देशी दारू वाहतुकीवर कारवाई



लातूर : प्रतिनिधी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या लातूर जिल्ह्याचे अधीक्षक केशव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क लातूर विभाग कारवाई करत राज्य उत्पादन शुल्क उदगीर विभागाने कासार शिरशी ते बडूर रोडच्या कडेला तालुका निलंगा, जिल्हा लातूर येथे अवैद्य देशी दारूचे दोन बॉक्स वाहतक करणारी दुचाकी चाकी १० किलोमिटर. पाठलाग करून पकडला. सदर कारवाईत दोन देशी दारूचे बॉक्स व दुचाकी चाकी मोटरसायकल असा ६६ हजार ७२० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कारवाई मध्ये उपाधीक्षक एम. जी. मुपडे, भरारी पथक धाराशिव लातूर, निरीक्षक आर. एम चाटे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक गणेश गोले, विक्रम परळीकर यांनी सहभाग घेतला.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE